# <u>प्रकरण -2</u>

# अध्याय -1

# संस्थेची कार्ये व कर्तव्य यांचा तपशिल

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या

(क्रमांक 4 (1)(ब) अन्वये 17 नियमावलींचे वर्णन खालीलप्रमाणे)

**खाते :- सह आयुक्त (दक्षता)**

| 4(1)(b)(i) |
| --- |

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये ही माहिती पुस्तिका तयार करण्यात आलेली असून, हया पुस्तिकेमध्ये 1 ते 17 भाग आहेत.

अ) खात्याची संरचना :-

1) सह आयुक्त (दक्षता) यांचे पद प्रमुख कर्मचारी अधिकारी कार्यालयाच्या आस्थापना अनुसूचीमध्ये अंतर्भूत केलेले आहे व सह आयुक्त (दक्षता) यांचा प्रशासकीय विभाग हा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त कार्यालयाच्या आस्थापना अनुसूचीमध्ये अंतर्भूत केलेला असून सदर विभाग सह आयुक्त (दक्षता) यांच्या प्रत्यक्ष अखत्यारित कामकाज पाहतो.

2) हा प्रशासकीय विभाग तांत्रिक प्रमुख म्हणुन नेमलेल्या सह आयुक्त (दक्षता) यांच्या अखत्यारीत येतो.

3) कर्मचा-याची रचना पुढीलप्रमाणे आहे -


सह आयुक्त (दक्षता)
कार्यकारी अभियंता (स्वीय)
(१ पद)
प्रशासकीय अधिकारी
(१ पद)
स्वीय सहाय्यक
(१ पद)
मुख्य लिपिक
(१ पद)
कनिष्ठ लघुलेखक
(१ पद)
लिपिक
(२ पदे)
जमादार
(१ पद)
शिपाई
(१ पद)

## (ब) कार्ये -

1. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत, अभियांत्रिकी विभागांशी संबंधीत महानगरपालिकेच्या विविध खात्यातील कंत्राटदारांमार्फत केल्या जाणा-या कामांची प्रचलित धोरणानुसार निविदा अटींप्रमाणे तपासणी करुन सर्व तांत्रिक बाबींवर सातत्याने व बारकाईने लक्ष ठेवणेबाबत वेळोवेळी आदेश देणे वा मंजूरी देणे.
2. अशा नागरी कामांमध्ये रस्ते बांधणी, पूल व इमारत बांधकाम, गटारांची बांधणी, पाणी पुरवठा प्रकल्प आणि मलनि:सारण प्रकल्पाचे बांधकाम आणि इतर अनेक प्रकारची संबंधित विभागांच्या सहाय्यक आयुक्तांतर्फे स्थापत्य कामाच्या कंत्राटदारामार्फत केली जाणारी परीरक्षणाची कामे इत्यादींचा समावेश होतो.
3. यांत्रिकी व विद्युत विभाग, प्रकल्प विभागाने केलेल्या संयंत्राची स्थापना, त्यांचे चलन व देखभाल करण्याच्या कामाची तपासणी करणे. घन कचरा व्यवस्थापन विभाग, रुग्णालये व विभाग कार्यालयांतर्फे मागविण्यात आलेल्या विविध यंत्रांची दुरुस्ती व परिरक्षणाच्या कामांची प्रचलित धोरणानुसार पाहणी करण्याबाबत प्रमुख अभियंता (दक्षता) यांना आदेश देणे.
4. म.न.पा.आयुक्त/अति.आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार ज्या तक्रारींमध्ये संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई सूचविलेली असते अशा तक्रारींचा काळजीपूर्वक तपास करुन अहवाल सादर करणे.

5. प्रचलित धोरणानुसार महानगरपालिकेच्या कोणत्याही भांडारास भेट देऊन त्यात साठविलेल्या भंगार व निरुपयोगी मालाची तपासणी करणे. तसेच मालाचे मोजमाप करुन घेणे व नंतर प्रचलित धोरणानुसार विल्हेवाटीची देखरेख करण्याबाबत प्रमुख अभियंता (दक्षता) यांना आदेश देणे.